# स्कूल /कॉलेज साठी मराठी ड्रामा स्क्रिप्ट |Marathi Drama Script For Children's

## पूर्वकल्पना :

हे एक सोशल संदेश देणारं एक नाट्य आहे. मुख्यतः शाळा किवा कॉलेज स्तरावर याच सादरीकरण तुम्ही करू शकता. लहान मुलांना झाडांच महत्व सांगणारे ही नाट्य आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात आपण झाडांच महत्व समजून घेतल पाहिजे कारण development आणि विकासाच्या नावावर जिकडे तिकडे वृक्षतोड होताना बऱ्यापैकी दिसते आहे. त्यामुळे आपल्या या नाटकाच्या माध्यमातून लहान मुलांना एक चांगला संदेश देण्याचा एक प्रामाणिक हेतु.

## पात्र :

पात्र आहेत : सूत्रसंचालक, दोन वडाची झाड( झाड १ , झाड २ ) , घर मालक, माळी.

## Marathi Drama Script For Children's | मराठी ड्रामा स्क्रिप्ट फॉर चिल्ड्रन्स

सुस्वागतम सुस्वागतम सुस्वागतम (गरज असल्यास शाळेच नाव) (इयत्ता) सदर करीत आहोत एक **नाटक " जगा आणि जगू द्या "**

(पडदा उघडतो ..रंगमंचावर एका बाजूला घराची समोरची बाजू दिसते आहे आणी एका बाजूला दोन छोटी वडाची रोप आहेत. ही रोप एका शेजारी एक आहेत आणी गप्पा मारत आहेत.)

**सूत्रसंचालक:** नमस्कार मंडळी मला तुम्ही ओळखलं असेलच ना
मी सूत्रसंचालक, आणी हो आजच्या या नाटकाची
सगळी सूत्र माझ्या हातात आहेत बर. त्या बाजूला
ही दोन वडाची झाड दिसतायत तुम्हाला
सकाळपासून बघतोय/बघतेय, काय बर गुलुगुलु
बोलत असतील ? तुम्हाला पण ऐकायचय ना.

चला तर मग बघूया .

**झाड १** : काय रे उठलास का?

**झाड. २** : हो रे आत्ताच... सूर्याची वाट बघतोय.

**झाड. १.** : मी सुद्धा. कालच्या सुटलेल्या वाऱ्याला कसबस तोंड दिल. सगळे अवयव दुखतायत अगदी मुळापासून ते पानाच्या शेंड्यापर्यंत.

**झाड २** : माझं काय वेगळं आहे अजून थोडा वारा सुटला असता तर मी तर मोडून पडलो असतो, नशीब थोडक्यावर निभावलं.

**झाडं १** : बर तुला एक विचारू काय ?

**झाड २** : हो विचार ना.

**झाड १** : तुझ्या जन्माबद्दल सांग ना माला, म्हणजे तुझा जन्म कसा झाला, तु इथे कसा काय आलास?

**झाड २** : नाही रे काही खास नाही, मुळात मला माझ्या जन्माबद्दल काहीच माहिती नाही पण माझं छोटंसं रोपटं झाल्यावर मी बाजूच्या घरातील परस बागेत असल्याच आठवतंय. मग काय हे झाड इथ नको अस म्हणून अलगद उपटून मला बाहेर फेकून दिल. सुदैवाने पाऊस पडत होता पाण्यातून वाहत वाहत कसाबसा पाय रोवत इथपर्यंत येऊन पोहोचलो.

**झाड १** : खूप भारी . वा परस बाग ते उकिरडा काय प्रवास आहे ... वा वा ..(थोडा हसत ). गंम्मत केली हा,राग नको मानूस.

**झाड २** : नाही रे राग कसला त्यात चालतंय. बर तु सांग ना तुझ्याबद्दल.

**झाड १** : माझं काही वेगळं नाही रे आपला प्रवास म्हणजे उकिरडा ते उकिरडा .म्हणजे कसंय ना बाजूच्या उकिरड्यावर माझा जन्म झाला ४ दिवसानी दिला फावडा मारून आणि फेकलं या उकिरड्यावर.

**सूत्रसंचालक** : बघितलं का वाटलं ना नवलं ! ही झाड पण माणसानप्रमाणे बोलतात बर. आता दिसत नसलं तरी आपण कल्पना तर करूच शकतो. थांबा-थांबा

आतापर्यन्त दिसत असलेलं हे चित्र असच राहणार आहे अस वाटतय तुम्हाला ? नेहमी आणी मुळात दूरून दिसणाऱ्या चांगल्या गोष्टींमध्ये काहीतरी surprise असतच.

**झाड १** : ही माणस पण बघ ना जी झाड त्यांना फायदा देतात त्यांनाच हे स्वतःच्या जवळ ठेवतात बाकीच्या झाडांचा त्यांना त्रास होतो.

**झाड २** : हो ना, पण त्यांना हे कळत नाही आहे की संपूर्ण साजिवसृष्टीसाठी आणी या वातावरणासाठी आमच्यासारख्या काही मोठ्या वृक्षांचा खूप मोठा वाटा आहे. आता दैनंदिन जीवनात आम्ही तितकेसे उपयोगात नाही येत म्हणून एकदम दुर्लक्ष करण किती योग्य आहे.

( यांचं बोलण सुरु असताना माळी येतो आणी घरासमोरीन बागेला पाणी घालण्यास सुरुवात करतो.... माळ्याला पाणी घालताना बघून घरमालक तेथे येतो )

**घरमालक :** रामू ...ए रामू... अरे आहेस कुठे ? तुला घरभर शोधतोय मी. तुला मी काल म्हटलं होत ना की मागच्या कुंपणात जी फळझाडें आहेत त्यांना दिवसातून दोनदा पाणी देत ना म्हणून.

**रामू** : होय मालक . काल मालकीण बाईंनी दुसर काम दिल होत म्हणून एकदा पाणी घालायचं राहून गेल.

**घरमालक** : अस का .. तरीपण उठल्यावर पाहिलं ते काम बाकीचं नंतर केलस तरी चालेल. समजल ?

**रामू** : हो मालक.

**घरमालक** : बर तु आवरून घे पटपट. आम्ही आलोच.

**रामू** : हो हो... आधी हेच काम करतो.

(आता एवढं बोलून घरमालक घरात निघून जातो)

(आता इकडे झाडांची कुजबुज सुरु होते ....माळी थोडा वेळ पाणी घालतो आणी निघून जातो )

**झाड १** : बघितल का रे ...केवढी ती प्रतिष्ठा ? केवढा तो मान सन्मान ? दिवसातून दोनदा पाणी द्या म्हणे, अरे आमच्याकडे निदान ढुंकून तरी बघा पाण्याचं दूरच राहील. तुला सांगतो एकदा नशिबाच दार उघडायला पाहिजे, अस वाटतंय ना की कुणीतरी यावं आणी मला सुद्धा त्या बगीचा मध्ये नेऊन ठेवावं. मग नुसतं राज्यासारखं राहायचं. ना पाण्याचं टेंशन, नाही कोणी तरी उपटून फेकून द्यायच टेंशन. माजाच मजा..कसंय...?

**झाड 2** : हे तुला वाटतंय तस आपल्या आयुष्यात काहीही घडणार नाही आहे, आणी जरी घडलं तरी साधारतः मानवाच्या दृष्टीने त्यांच्या रोजच्या आयुष्यात आपल काहीही महत्व नाही त्यामुळे फार काळ तिथे टिकावं लागणं आपल्याला तरी शक्य नाही. एकंदर तु हे सगळे विचार करण बंद कर.

**सूत्रसंचालक :** काय मग अजून डोक्यात प्रकाश पडत नाही आहे वाटत. बर कसंय ही झाड काय आपल्या दुनियेत वावरतायत, तो माळी आपल्या दुनियेत, तो घरमालक आपल्याच नादात. हे त्रिकुट नक्की आपल्याला काय सांगू पाहतंय हे त्यांनाच माहित.

**झाड १** : हे बघ तु मला भलात-सलत सांगून भरकटवू नकोस, आता किती आणी काहीही झाल तरी मला त्या बगीचा मध्ये जायचंच आहे .

**झाड २** : हे बघ मी वाद घालत नाही आहे, तिथे राहून पाहिलंय, ऐकलंय तेच सांगतोय.

(दोघ बॅग्राऊंड ला भांडतायत हे दृश्य आणी सूत्रसंचालक पुढील सुचना देतो)

**सूत्रसंचालक :** काय बर यांचं होणार कुणास ठाऊक एकाच

घरात राहून प्रॉपर्टीसाठी माणस भांडतात तस
आता यांच झालय. मघाशी तरी हलकीफुलकी
लवंगी फटाकी वाटत होती आणी आता तर दोन्ही
बाजूने ॲटम बॉंब फुटायला लागलेत. शु ....शु...
घरमालक बाहेर येतायत गप्प बसा ..................(प्रेक्षकांकडे बघून )

**घरमालक** : रामू ए रामू.....कुठे गेलास रे....ऐकतोस ना ...

**रामू** : होय मालक

**घरमालक** : बाहेर ये बघू आधी.

**रामू** : हा मालक बोला....नाही ते मालकीण बाईंना थोड मदत करत होतो.

**घरमालक** : हे बघ उद्या वाटपौर्णिमा आहे गावातल्या सर्व बायका आपल्या नवऱ्यासाठी वडाची पूजा करणार, फेरे मारणार, आपल्या नवऱ्याला चांगल आयुष्य लाभाव यासाठी ही पूजा केली जाते. तुला सत्यवान आणी सावित्री ची गोष्ट माहीतच असेल ना .

**रामू** : होय पर्वादिवशी मालकीणबाईंनीच सांगितली होती.

**घरमालक** : वा .. .मग ऐक मालकीणबाईंना आता बाहेर जाता येत नाही त्यामुळे गावच्या वेशीवर वडाची पूजा करायला जायला त्यांना झेपणार आहे का?

**रामू** : नाही नाही

**घरमालक** : हो ना .... मग अस कर .. आजूबाजुला जाऊन बघ कुठे वडाच रोपटं आहे का, ते घेऊन ये आणी एका कुंडीत लाव . कसंय सध्या शहराच्या ठिकाणी या सर्व गोष्टी चालतात. म्हणजे पूजाही झाली आणी त्यांनाही त्रास नाही .बर जा आता लवकर बघ रोपटं सापडतंय का .

**सूत्रसंचालक** : आता मालकांचा आदेश म्हंटल्यावर माळी निघालाय बर ...वडाच रोपटं शोधायला.

घराच्या आजूबाजूला शोधतोय. खूप वेळ शोधून झाल्यावर त्याची नजर त्या दोन रोपट्यांवर पडली. आता माळी एकदान खुश झालाय. त्याचा आनंद गगनात मावेनासा झालाय.

(सूत्रसंचालक बोलत असताना माळी वरील सूचनांनुसार बॅग्राऊंड ला ॲक्ट करतोय)

**रामू** : अरे वा देव पावला. म्हणजे देवाकडे मागितलं एक आणी मिळाले दोन. आता यापैकी कुठला घेऊ ...हा हाच घेतो.

(अस म्हणून तो झाड १ ला उपटतो आणी घरी जायच्या वाटेला लागतो)

**झाड १** : काय मग बघितलं का नशीब असावं तर अस. आता या पुढील आयुष्य राजासारखं जगायचं. तु राहा इथेच.

**झाड २** : हे बघ ही माणस दिसतात तशी नाही आहेत रे यांना फक्त आपला फायदा दिसतो बाकी काही नाही.

**झाड १** : तु आता मला शहाणपणा शिकवू नकोस. तु राहा इथेच.

(माळी त्या रोपला घेऊन जातो आणी एका कुंडीमध्ये लावतो त्याला पाणी घालतो. हा सर्व प्रकार बघून ते रोपटं खूप खुश होत. दुरून दुसर रोप सुद्धा हा प्रकार पाहत परंतु त्याला हयाच किंचित सुद्धा नवलं वाटत नाही )

**सूत्रसंचालक** : काय मंडळी आज सण आहे आणी तुम्ही असे काय बसलात अजून. आज वाटपौर्णिमा आहे बर सकासकाळी वडाच्या झाडाची पूजा सुद्धा झाली. हे रोपटं जाणू काही स्वर्गात गेल्यासारखं दिसतय. म्हणजे लोक त्याच्या पाया काय पडतायत, त्याला नैवेद्य काय दाखवतायत . त्याला मात्र आपल आयुष्य सुखकर झाल्याचं खूप कौतुक वाटतंय.

(स्टेजवर निरव शांतता.... आता बाहेरच रोपटं आणी हे रोपटं यांच्या फारसा संबंध येत नाही आहे त्यामुळे बोलणही कमीच होत ...अधून मधून केव्हातरी )

**सूत्रसंचालक** : दिवसामागून दिवस गेले एक दोन तीन.....जसजसे दिवस जायला लागले तसतशी रोपही वाढायला लागली .बाहेरचे रोप अगदी आनंदाने, बिनधास्त वाढत राहिले आणी कुंडीमधील रोपाला मात्र हे स्वातंत्र नाही आहे. माळी अधून मधून त्याच्या वाढलेल्या फांदया तोडू लागला. किंचित का होईना या रोपाला दुसऱ्या रोपाचे बोलणे आठवायला लागले.

**झाड १** : माणूस तो शेवटी माणुसच, अरे बाकी कुणाला नाही पण तुम्हाला देवाने डोक दिलंय,विचार करण्याची क्षमता दिलीय तरी तुम्ही षंढ ते षंढच. अरे आम्ही आमचं सर्वस्व देतो रे तुम्हाला ,आमचा एक अवयव तरी बिनकामाचा आहे का रे ? प्रत्येक अवयवाचा तुम्ही वापर करता. लक्षात ठेवा तुम्ही आहात म्हणून आम्ही नाही तर आम्ही आहोत म्हणून तुम्ही आहात. चालले सुधारणा करायला, मॉडर्न होतायत म्हणे आज झाडांची कत्तल होतेय उद्या तुमची व्हायला वेळ नाही लागणार.

(हे बघून बाहेरच झाड टाळ्या वाजवू लागलं ....या झाडाला त्या गोष्टीची जाणीव झाली याचा त्याला खूप आनंद झाला.)

**सूत्रसंचालक** : झाड.... अक्षर जरी दोन असली ना तरी संपूर्ण सृष्टी या दोन अक्षरांवर चालली आहे. आज मनुष्याने स्वतःच्या स्वार्थासाठी कित्येक जंगले

उध्वस्थ केली आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वाचा असणारा घटकच जर आपण नाहीसा केला तर पर्यावरण आपल्यावर सुद्धा अशीच वेळ आणल्याशिवाय राहणार नाही. वड, पिंपळ, आंबे ,सागवण, सिसम,ऐन,किजळ यांसारखी मोठ- मोठी झाडें मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन निर्माण करतात शिवाय पर्यावरणाच्या दृष्टीने ही यांचा मोठा वाटा आहे. एकंदर वृक्षतोड थांबवा ,जास्तीत जास्त झाडें लावा आणी झाडांना तुमच्या नाही तर त्यांच्या मर्जीने वाढू द्या .त्यांना तुमच्या बंधनातून मुक्त करा जेणेकरून ते उंच अवकाशकडे झेप घेऊ पाहतील आणी तुमच्या आमच्यावर येणाऱ्या संकटांना सर्वात आधी स्वतःचा अंगावर घेतीत.

**घरमालक** : रामू ए रामू ...

**रामू** : हा मालक ....बोलावलात..

**घरमालक** : हे बघ...आज मला भयाण स्वप्न पडलं ..तेही या वडाच्या झाडाच ...माझ्याकडे गयावया करत होत मला माझं स्वातंत्र द्या ,मला मुक्त करा ...तु एक काम कर या झाडाला आत्ताच्या आत्ता घेऊन जा आणी त्याच्या पूर्वीच्या जागी परत लावून ये.

**रामू** : हो मालक...आत्ता जातो.

(रामू ते झाड नेऊन त्याच्या पूर्वीच्या जागी लावतो...दोन्ही झाड आनंदाने नाचू लागतात)

**झाड २** : काय शेठ ....कस काय ..? झाली हौस पूर्ण.

**झाड १** : हो हो... ते म्हणतात ना परतंत्र्यात राहून गोडधोड खाण्यापेक्षा स्वातंत्र्यात राहून शिळ अन्न खाल्लेल कधीही उत्तम.

**झाड २** : उत्तम ....लवकर समजल तुला...आणी हो तुम्ही...प्रत्येकाने एक झाड तरी नक्की

लावा ..आणी त्याला स्वातंत्र्याने वाढू द्या.

**झाड १** : झाडें लावा झाडें जगवा.

**सूत्रसंचलक** : बर का मंडळी या झाडांनां मात्र स्वतःच स्वातंत्र मिळालं, तुमच्याजूबाजूला असलेल्या झाडांना स्वातंत्र कधी मिळणार? प्रत्येकाने विचार करा आणी नक्की एक तरी झाड लावा जेणेकरून आपण पर्यावरणाचा समतोल राखण्यास यशस्वी होऊ.....

धन्यवाद....

**पडदा पडतो....**